पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ ६४२ /२०१३
दिनांक - १२ /०७/२०१३

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक १७/०७/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/०७/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ४

दिनांक :- १७/०७/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/०७/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक १९/०६/२०१३, ०३/०७/२०१३, ०९/०७/२०१३ (दु.१२.०० व ४.३० वा.) रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र. ३**) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.१) मा.क प्रभाग समिती सभा दि.७/९/२०११ ठराव क्र.४२ नुसार प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील हरित विभागातील क्षेत्श्र लगतच्या निवासी विभागासह यापूर्वी मनपाचे नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झाले आहे. तथापि गाव मौजे - बो-हाडेवाडी येथील नविन गट नंबर ७५ व लगतचे क्षेत्र प्राधिकरणने संपादन केलेले नाही. मात्र सदर क्षेत्र नजरचुकीने प्राधिकरणाचे नियंत्रणाखाली ठेवले गेले आहे. या ठिकाणी विकास परवानगी घेणेसाठी जमीनधारक प्राधिकरणाकडे गेल्यास क्षेत्र मनपाचे नियोजन नियंत्रणाखाली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येते व यापूर्वी मनपाकडे आलेले क्षेत्रात या जागेचा समावेश नसल्याने मनपा मार्फत विकास परवानगी देण्यात येत नाही. सबब असे सर्व क्षेत्राचा शोध घेऊन ते मनपाचे नियोजन नियंत्रणात घेऊन म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर क्षेत्राच्या झोन निश्चितीची कार्यवाही करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

(दिनांक १७/०७/२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/६४२/२०१३
दिनांक - १२/०७/२०१३.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda३doc.